HE

LCV - अद्ययावत् मोड्युल

# सुरक्षित ड्रायव्हिंग

वाहन चालविण्याच्या मुलभूत गोष्टी आणि रस्त्यांच्या नियमांबाबतची माहितीपुस्तिका



# सुरक्षित ड्रायव्हिंग

वाहन चालविण्याच्या मुलभूत गोष्टी आणि रस्त्यांच्या नियमांबाबतची माहितीपुस्तिका

# प्रकाशनवृत्त

भारताच्या वेगाने होणाऱ्या विकासाबरोबरच अनेक समस्याही उभ्या राहिल्या आहेत. आपल्या रस्त्यांवर वाहनांच्या संख्येत होणाऱ्या वाढीसोबतच तसेच गाडी चालविताना मोबाईलवर बोलणे, दारू पिऊन गाडी चालविणे किंवा धूम्रपान करीत गाडी चालविणे, यांसारख्या गोष्टी जीवित आणि मालमत्तेची हानी होण्याची कारणे ठरत आहेत.

बेदरकारपणे ड्रायव्हिंग केल्यामुळे (वाहन चालविल्यामुळे) होणाऱ्या मृत्यु आणि जखमींच्या घटनांच्या बातम्यांचा ओघ सतत सुरूच असतो. या आकडेवारीचा आपणही एक भाग होऊ नये, यासाठी आपण अत्यंत काळजीपूर्वक राहिले पाहिजे.

सुशिक्षित आणि सजग तसेच अन्य रस्ता वापरकर्त्यांबद्दल सौजन्य बाळगणाऱ्या, कायद्याचा आदर करणाऱ्या आणि रस्ता जबाबदारीने वापरणाऱ्या ड्रायव्हर (वाहनचालकांची) ची संस्कृती निर्माण करणे, हाच आपल्या रस्त्यांवर होणाऱ्या संवेदनहीन मृत्यु रोखण्याचा एकमेव उपाय आहे. आपल्यापैकी प्रत्येकाला वैयक्तिक आणि सामुहीक जबाबदारी घेऊन रस्त्यांची अवस्था बदलणे आणि रस्ता–वापरकर्त्यांची वृत्ती बदलणे शक्य आहे.

प्रकाशित केले. ह्युबर्ट एबनर (भारत) प्रायव्हेट लिमिटेड.
सी-18, चिराग एनक्लेव्ह,
नवी दिल्ली.110048 (भारत)
Tel.: +91 11 46107654
ई–मेल–driving@he-india.com
वेब–www.he-india.com
© सर्व हक्क आरक्षित

आवृत्ती– February 2013

या प्रकाशनातील कोणताही भाग/मजकूर प्रकाशकाच्या पूर्व परवानगीशिवाय कोणत्याही स्वरूपात पुनरूत्पादित, जमा केला जाणार नाही किंवा इलेक्ट्रॉनिक (दृक–श्राव्य), यांत्रिकी, झेरॉक्स, रेकॉर्डिंग किंवा अन्य कोणत्याही स्वरूपात प्रसारित केला जाणार नाही. सार्वजनिक प्रचारस परवानगी नाही.

# अनुक्रमणिका




## ■ LCV–मुलभूत — 1-24

| | |
|---|---|
| **जबाबदार ड्रायव्हर** | **1-10** |
| ड्रायव्हरच्या (वाहनचालकाच्या) जबाबदाऱ्या | 1 |
| आवश्यक कागदपत्रे | 1 |
| ड्रायव्हींग लायसन्स (वाहन चालविण्याचा परवाना) | 2 |
| मोटर वाहन नोंदणी (रजिस्ट्रेशन) | 2 |
| ओझ/सामान आणि प्रवासी चढविणे | 4 |
| वाहन आणि मालाची/सामानाची सुरक्षितता | 5 |
| सामाजिक जबाबदारी | 6 |
| चांगल्या ड्रायव्हरची वैशिष्ट्ये | 6 |
| आरोग्य आणि स्वास्थ्य | 7 |
| ज्ञान, प्रशिक्षण, कौशल्य आणि अनुभव | 9 |
| वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन आणि दंड | 10 |
| **वाहनाबद्दलच्या माहितीची (ज्ञानाची) आणि देखभालीची गरज** | **11-14** |
| वाहनाची देखभाल | 11 |
| **ब्रेकडाऊन /अपघात/टोईंग (वाहन ओढून नेणे)** | **15-18** |
| ब्रेक नादुरूस्त होणे | 15 |
| अपघात | 16 |
| टोईंग (वाहन ओढून नेणे) | 17 |
| **प्रथमोपचार** | **19-24** |
| | 19 |
| रस्ता अपघातामधील जखमींसाठी प्रथमोपचार | 19 |
| डोक्याला झालेली दुखापत/जखमा | 20 |
| मान आणि पाठीच्या कण्याला झालेली दुखापत/जखमा | 21 |
| छातीच्या दुखापतीची लक्षणे | 21 |
| फ्रॅक्चरची लक्षणे | 22 |
| बाह्य जखमा आणि परफॉरेटेड जखमा भाजणे | 23 |



## ■ LCV—1 — 25-48

| | |
|---|---|
| **वाहनाचे गतिविज्ञान/गतिशास्त्र** | **27-30** |
| गुरूत्वाकर्षण | 27 |
| गति–उर्जा | 27 |
| वाहनाचा वेग | 28 |
| वाहनाची संरचना | 28 |
| रस्त्याच्या पृष्ठभागाला होणारे टायरचे घर्षण | 28 |
| रस्त्याची स्थिती | 29 |
| रस्त्याचे अभियांत्रिकी शास्त्र/बांधकाम शास्त्र | 29 |
| ब्रेकिंग प्रणाली/व्यवस्था | 30 |
| | 30 |
| **कठीण परिस्थितीत वाहन चालविणे** | **31-38** |
| रस्त्याची स्थिती | 31 |
| प्रतिकूल हवामानाची स्थिती (हवामान) | 33 |

# अनुक्रमणिका


**धोक्याची जाणीव (अनुमान)** **39-44**

धोक्याचा अंदाज/जाणीव *39*

वेग कमी करणे आणि ब्रेकचे व्यवस्थापन *42*

दृश्यता *43*

**आपत्कालीन स्थिती** **45-48**

टायर फुटणे *45*

ब्रेक नादुरूस्त होणे (ब्रेक फेल) *46*

बोनेट प्लाईंग अवे *46*

कृती टाळणे (हालचाल टाळणे) *46*

वाहनाने पेट घेणे (वाहनाला आग लागणे) *46*

वाहन घसरणे *47*

वाहनाचा पाठलाग करणे *48*





**LCV–2** **49-68**

**वाहनाचे तंत्र आणि देखभाल** **51-68**

साधारण *51*

मोटार वाहनाचे भाग *51*

मोटार वाहनाच्या विविध प्रणाली/व्यवस्था *51*

वाहन चालविताना नियंत्रण *55*

मोटार वाहनाची तपासणी *60*

प्रतिबंधात्मक देखभाल *63*

वाहनाची देखभाल *64*

त्रुटी निदान *66*





**LCV–3** **69-80**

**शोफर अर्थात् मोटारचालकाची वैशिष्ट्ये–** **71-80**

शोफरची भूमिका *71*

कायदेशीर बाजू *71*

ग्राहकाशी संबंध *72*

वाहनाची देखभाल आणि स्वच्छता *74*

वाहतुकीचे दायित्व/बंधन *75*

वैयक्तिक स्वरूप/निटनेटकेपणा *75*

विशेष प्रवाशांना हाताळणे *77*

काही समस्या *78*

अपघात/ब्रेक नादुरूस्त होणे *79*

# जबाबदार ड्रायव्हर (वाहनचालक)




301636

सुरक्षितपणे ड्रायव्हींग करण्यासाठी उत्तम प्रशिक्षणाची गरज असते आणि ती एक मोठी जबाबदारीही असते. ड्रायव्हरच्या वाहनाच्या सुरक्षिततेबाबत,सामान आणि प्रवासी यांच्या वाहतुकीबाबत तसेच प्रशासकीय आणि सामाजिक जबाबदाऱ्या असतात. मोटार वाहन चालविण्यासाठी तुमच्याकडे वाहन चालविण्याचा वैध परवाना असणे तसेच नोंदणीकृत आणि इन्शुरन्स असलेले रस्त्यावर चालण्यायोग्य स्थितीतील वाहन असणे आवश्यक आहे.

एका चांगल्या ड्रायव्हरकडे चांगले आरोग्य, सकारात्मक दृष्टीकोन आणि रस्त्यावरून जाणाऱ्या अन्य वाहनांबद्दल सकारात्मक वर्तन आवश्यक आहे. तसेच त्याने रस्त्यावर सुरक्षित ड्रायव्हींग करण्याचे तंत्र आत्मसात केले पाहिजे. शरीरस्वास्थ्य उत्तम राखणे ही ड्रायव्हरची नैतिक जबाबदारी आहे. कोणते घटक आणि परिस्थिती त्याच्या सुरक्षित ड्रायव्हींग करण्याच्याक्षमतेवर परिणाम करतात याबद्दल तो जागरूक असला पाहिजे,

## » वाहनचालकांच्या जबाबदाऱ्या

वाहनचालक खालील गोष्टींसाठी जबाबदार असतो

- तो चालवित असलेल्या वाहनाच्या प्रकाराचे आणि त्या क्षमतेचा परवाना (लायसन्स)
- ड्रायव्हींग करताना सतत आवश्यक ती कागदपत्रे, प्रथमोपचाराची पेटी आणि धोक्याचा त्रिकोण जवळ बाळगला पाहिजे.
- वाहनाचे आरोग्य–वाहन रस्त्यावर चालविण्यायोग्य स्थितीत ठेवणे ही त्याचे कर्तव्य आहे.
- वाहून नेत असलेल्या ओझ्याची सुरक्षितता त्याचबरोबर प्रवाशांची सुरक्षित वाहतूक हे त्याचे कर्तव्य आहे. तो वाहून नेत असलेले ओझे सुरक्षित आहे ना आणि ते मर्यादेपेक्षा जास्त भरले गेले नाही ना याबाबत त्याने खात्री करून घेतली पाहिजे.
- सर्व परिस्थिती आणि स्थितींमध्ये वाहनांना हाताळायला तो सजग आणि शारीरिकदृष्ट्या सक्षम असला पाहिजे. (थकलेला नको/दारू प्यायलेला नसावा किंवा त्याचे लक्ष विचलित नको.)
- वाहनामध्ये बसण्याची जागा ही योग्य आणि आरामदायी असावी, ज्यामुळे वाहनचालकांना त्यांच्या गाडीचे नियंत्रक आणि पॅडलपर्यंत सहजपणे पोहोचता येईल आणि स्टीअरिंग व्हील कोणत्याही अडथळ्याशिवाय हाताळता येऊ शकेल.
- नेहमी सीटबेल्ट वापरावा.
- त्याची रस्त्यावरील आणि रस्त्याच्या वाहतुकीबद्दलची दृश्यता उत्तम आणि स्पष्ट आहे, याची खात्री करून घ्या. विंडस्क्रीन (समोरील काच) नेहमी स्वच्छ ठेवलेली आणि बाजूचे आरसे योग्यरित्या जुळवून घेतलेले असावेत.
- वाहन पर्यावरणीय योग्य दृष्ट्या चालविणे. अचानक वेग वाढविणे किंवा ब्रेक लावणे टाळणे. थांबण्याच्या ठिकाणी लाईट्स बंद करणे आणि सावकाश निघणे.

## » आवश्यक कागदपत्रे

उत्तम वाहनचालकाला तो चालवित असलेल्या वाहनाच्या सर्व आवश्यक कागदपत्रांची माहिती तसेच तो वाहनचालक आहे, हे स्पष्ट करणाऱ्या वैयक्तिक कागदपत्रांची माहीती असावी.

सर्व कागदपत्रे नेहमी तयार तसेच अद्ययावत ठेवणे ही त्याची जबाबदारी असते, उदा– वाहन चालविण्याच्या परवान्याचे नूतनीकरण, रस्ता कर आणि परवाना. वाहतुकीच्या नियम आणि शिस्त याबद्दल तो पूर्णपणे परिचित असावा.

वाहन चालविताना वाहनचालकाने खालील कागदपत्रे जवळ बाळगणे आवश्यक आहे–

- वाहन चालविण्याचा वैध परवाना
- वाहनाचे नोंदणी केलेले प्रमाणपत्र
- जसे लागू असेल तसे रस्ता कर प्रमाणपत्र
- इन्श्युरन्स प्रमाणपत्र
- प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र
- वाहनाचे प्रमाणीकृत प्रमाणपत्र/परमीट (फक्त प्रवासी आणि व्यावसायिक वाहनांसाठीच लागू)




300457

# जबाबदार ड्रायव्हर (वाहनचालक)

गणवेशात असलेला पोलीस अधिकारी किंवा वाहतूक विभागाचा अंमलबजावणी अधिकारी आणि कोणत्याही वेळेस ही कागदपत्रे तपासू शकतात.

केवळ गॅझेटेड सरकारी अधिकाऱ्यांनी सही – शिक्का मारलेलीच झेरॉक्स कॉपी स्विकारली जाऊ शकते.

वैध प्रमाणपत्र सादर न करणे हा शिक्षापात्र गुन्हा आहे, अशा वेळेस वाहनही जप्त होऊ शकते.

## » वाहन चालविण्याचा परवाना

वाहन चालविण्याचा परवाना हा परवाना धारकाला खालीलपैकी एक किंवा त्यापेक्षा जास्त प्रकाराचे मोटार वाहन चालविण्याचा अधिकार देते:

- गिअरशिवाय मोटारसायकल
- गिअरसह मोटारसायकल
- तीनचाकी
- हलके मोटार वाहन (खासगी / व्यावसायिक)
- प्रवासी वाहन (माल / प्रवासी)
- विशिष्ठ मोटार वाहन

### वाहन चालविण्याच्या परवानाची वैधता

तुम्ही लायसन्स घेतल्यापासून 20 वर्षांपर्यंत किंवा तुम्ही 50 वर्षांचे होईपर्यंत, यापैकी जे लवकर असेल, त्या वेळेपर्यंत लायसन्स लागू असते. 50 वर्षांनंतर ही वैधता 5 वर्षांची होते.

जर तुमचा परवाना व्यावसायिक प्रवासी किंवा माल घेऊन जाणारे वाहन असेल, तर त्या परवाना दर तीन वर्षांनी किंवा परवाना देणाऱ्या यंत्रणेच्या करारानुसार नूतनीकरण केले पाहिजे.

### वाहन चालविण्याच्या परवान्याचे नूतनीकरण

लायसन्सचे नूतनीकरण तुमच्या वयावर अवलंबून असते. जर तुम्ही 30 वर्षांचे आहात, तर तुमच्या लायसन्सची वैधता ही 50 वर्षे वयापर्यंत असते. जर तुमचे वय 45 किंवा त्यापेक्षा जास्त असेल, तर नूतनीकरणाचा कालावधी एकावेळेस 5 वर्षांचा असतो.

वाहन चालविण्याच्या परवान्याची मुदत संपल्यानंतर 30 दिवसांच्या आत तुम्हाला परवान्याचे नूतनीकरण केले पाहिजे. परवान्याची मुदत संपल्यानंतर 30 दिवसांनी वाहन चालविणे हा गुन्हा आहे.

### आवश्यकता

- फॉर्म क्रमांक 9 मधील अर्ज
- वय आणि निवासाचा दाखला
- आवश्यक असेल तेथे वैद्यकीय प्रमामपत्र
- सध्याचा वाहन चालविण्याचा परवाना
- पासपोर्ट आकाराचे तीन फोटो

### परवाना हरविल्यास

परवाना हरविल्यास त्याबद्दल ताबडतोब परवाना दिलेल्या कार्यालयात तक्रार दिली गेली पाहिजे. परवान्याची नक्कल किंवा दुसरी प्रत मिळविण्यासाठी खालील प्रक्रियेचे पालन करा:

- सर्व माहिती आणि तपशीलासह पोलीस स्टेयानमध्ये परवाना हरविल्याची तक्रार द्या.
- व्यावसायिक परवाना हरविल्यास वाहतूक पोलीसांकडून चलन अहवाल मिळवा.
- फॉर्म 6 मधील अर्ज भरा.
- तुमच्या हरविलेल्या परवान्याची झेरॉक्स.
- वय आणि निवासाचा दाखला.
- लागू असलेले शुल्क.

तुमच्या स्वतःच्या फायद्यासाठी, नेहमी तुमच्या वाहन चालविण्याच्या परवान्याची झेरॉक्स किंवा तुमच्या परवान्याचा नंबर, तारीख आणि ज्या प्राधिकरणाकडून लागू केले त्याची माहिती, हे जवळ बाळगा.

## » मोटार वाहनाचे नोंदणीकरण

### नोंदणीकृत क्रमांक

वाहन नोंदणीकृत असल्याशिवाय आणि त्याचा नोंदणी क्रमांक असल्याशिवाय ते चालविता येत नाही.



नोंदणीची खूण, वाहतूक प्राधिकरणाकडून दिला गेलेला क्रमांक हा असा असला पाहिजे–

- मोटार वाहनाच्या पुढील तसेच मागील बाजूस लावला पाहिजे.
- ठराविक अंतरावरूनही स्पष्ट दिसू शकेल अशा स्पष्ट केलेल्या आकाराचा असावा

विचित्र पध्दतीने लावलेला क्रमांक बेकायदेशीर आहे आणि शिक्षापात्र गुन्हाही आहे.

"च्या साठी अर्ज केला आहे" अशा नंबरप्लेटसह वाहन चालविण्यास परवानगी नाही.

नंबर प्लेटवरील अक्षरांचा आकार, आकडे तसेच रंगसंगती हे सर्व कायद्यानुसार नियंत्रित होते.

संबंधित अधिकाऱ्यांकडून कोणतीही शिक्षा किंवा कायदेशीर कारवाई होऊ नये यासाठी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करा.

## "प्रदुषण नियंत्रण" प्रमाणपत्र

तुमच्या वाहनाला वैध "प्रदुषण नियंत्रण" प्रमाणपत्र असलेच पाहिजे. बहुतेक राज्यांमध्ये वय आणि वाहनाच्या प्रकारानुसार वेगवेगळया आवश्यकता आहेत.




या आवश्यकता काय आहेत त्याबद्दल जागरूक असणे तसेच राज्याचे नियम आणि मार्गदर्शक तत्वांनुसार चालणे खूप महत्त्वाचे आहे.

## वाहन तंदुरूस्ती प्रमाणपत्र

केवळ सुरक्षित आणि योग्य देखभाल केलेली वाहानानाच रस्त्यांवर चालण्यासाठी परवानगी असते. जर वाहन 15 वर्षांचे असेल, तर त्याला ते रस्त्यावर चालण्यायोग्य आहे, यासाठी तपासणी करून घ्यावी लागते. ही तपासणी 15 वर्षांपेक्षा सर्व जुन्या वाहनांसाठी आवश्यक आहे.

## ठराविक कालावधीने केलेली तपासणी आणि वाहनाची देखभाल

केवळ रस्त्यावर चालण्यायोग्य असलेल्या वाहनांनाच रस्त्यावर उतरण्याची परवानगी असते. याचा अर्थ वाहनाचे सर्व यांत्रिक आणि इलेक्ट्रीकल भाग योग्यरित्या काम करीत असले पाहिजेत आणि वाहनाची योग्य देखभाल केलेली असावी. चालवित असलेले वाहन चालण्यायोग्य सुरक्षित स्थितीत ठेवणे ही चालकाची जबाबदारी असते. वाहनाची वेळोवेळी योग्यरित्या देखभाल केलेली असावी आणि ते कोणत्याही वेळेस सुरक्षित चालू शकेल इतक्या उत्तम अवस्थेत असावे.

सुरक्षितपणे वाहन चालविण्यासाठी वाहन चालविण्यापूर्वीची तसेच दैनंदिन तपासणी आवश्यक आहे.

वाहन चालविताना दरवेळेस उपकरणांच्या पॅनेलवर, आरशांवर तसेच वाहनाच्या आवाज नजर ठेवा. जर कोणताही

धोक्याचा इशारा देणारे लाईट लागले, घंटा वाजली किंवा वास आला किंवा तुमचे वाहन नेहमीसारखे सुरळीतपणे चालत नसल्यासारखे तुम्हाला वाटले तर त्वरित वाहन थांबवा आणि काय समस्या आहे ते शोधून काढा.




जर समस्या सापडली नाही किंवा सोडविली शकते नाही याचा निर्णय गेली नाही, वाहन सुरक्षितपणे चालविता येऊ शकते नाही याचा निर्णय येते की याचा निर्णय घ्या किंवा ते वाहन जवळच्या वर्कशॉपमध्ये उचलून नेण्याची गरज आहे का याबाबत निर्णय घ्या.

वाहन चालविण्यापूर्वी तपासणी, पेट्रोल पंपांवर कालांतराने केली जाणारी तपासणी आणि नियमित सर्व्हिसिंग यामुळे वाहन चालविताना येणाऱ्या समस्या कमी होऊ शकतात आणि देखभाल खर्चही कमी होतो.

# जबाबदार ड्रायव्हर (वाहनचालक)

## वाहनाचा दुरूपयोग/गैरवापर

जर वाहन तुमच्या मालकीचे नसेल, तर वाहनाचा दुरूपयोग करू नका. दिलेल्या कामासाठीच त्याचा उपयोग करा आणि अधिकृत व्यक्तींपेक्षा अन्य कोणालाही वाहन चालवू देऊ नका.

अपघात झाल्यास, मालकाला त्याची त्वरित कल्पना द्या.

## » चढणे आणि उतरणे

ओझे चढविणे आणि उतरविणे हा एक महत्त्वाचा घटक वाहनांची स्थिरता, नियंत्रण आणि कौयाल्य यांच्यावर प्रभाव पाडतो. प्रत्येक वाहनाची ओझे वाहून नेण्याची एक ठरावीक क्षमता असते तसेच प्रवायांच्या संख्येचीही ठरावीक क्षमता आहे.

वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त ओझे चढविल्यामुळे आणि उतरविल्यामुळे त्यामध्ये वाहन खराब होऊ शकते तसेच वाहनावरील नियंत्रणही जाऊ शकते. यामुळे अत्यंत धोकादायक स्थिती निर्माण होऊ शकते तसेच वाहन चालविताना नियंत्रणही जाऊ शकते.




## माल/वस्तु वाहून नेणे

- वाहनाच्या क्षमतेपेक्षा जास्त ओझे लादू नका. नेमून दिलेल्या मर्यादा ओलांडू नका. (किलोग्रॅम/मीटर/रूंदी/उंची)
- वाहतूक केली जाणारी प्रत्येक वस्तू किंवा पाकिट हे सुरक्षित ठिकाणीच ठेवा. त्याची काळजी घ्या.
- कधीही खिळे, लॅपटॉप पाण्याच्या बाटल्या, आग विझविण्याची साधने, स्टोव्ह, बादल्या, ओढण्याची साखळी, इत्यादी वस्तू मागील सीटच्या शेल्फवर किंवा मागील सीटवर मोकळया आणि असुरक्षितपणे ठेवू नका. समजा तुमच्याकडून अचानक ब्रेक लागला, तर या वस्तू तुमच्या केबिनमध्ये इतरत्र पसरू शकतात आणि धोकादायक ठरू शकतात, त्यामुळे तुम्हाला किंवा तुमच्या मदतनीसाला आणि प्रवाशांनाही धोका पोहोचू शकतो. यामुळे वाहनावरील नियंत्रण सुटू शकते.
- अवजड सामान गाडीच्या आतील बाजूस बूटमध्ये किंवा डिकीमध्येच ठेवले गेले पाहिजे.




- ओझ्यामुळे तुमचे वाहन चालविण्याच्या आसपासच्या दृययतेवर परिणाम होऊ नये.
- प्रवासी आणि सामानाची एकत्र वाहतूक करताना नेहमी जास्त काळजी घ्या.
- गाडीच्या वरील छत वापरताना, सामानामुळे छत/टप तुटणार नाही, याची खात्री करून घ्या. प्रत्येक वाहनाच्या टपाची सामान घेण्याची ठराविक क्षमता असते. वाहून नेले जाणार सामान योग्य रितीने ठेवले गेले आहे आणि ड्रायव्हिंग करताना किंवा रस्त्यावरील वाहनांना त्यापासून धोका पोहोचत नाही ना याची खात्री करून घ्या.




**इशारा**

टपावर क्षमतेपेक्षा जास्त सामान ठेवल्यास, त्यामुळे गाडीचा समतोल बिघडू शकतो आणि अत्यंत धोकादायक पध्दतीने गाडीवरील नियंत्रण सुटून अपघात होऊ शकतो. त्यामुळे संपूर्ण आराम, सुरक्षितता या ड्रायव्हरच्या जबाबदाऱ्या आहेत.

## प्रवाशांची वाहतूक

वाहनचालक हा प्रवाशांच्या सुरक्षित वाहतुकीसाठीही जबाबदार असतो. गाडीमध्ये उपलब्ध असलेल्या आसन क्षमतेपेक्षा किंवा त्या वाहनाच्या वाहून नेण्याच्या क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहून नेऊ नका.

वाहनात क्षमतेपेक्षा जास्त ओझे लादल्यास गंभीर अपघात होऊ शकतात.




सर्व प्रवाशांनी सीटबेल्ट्स बांधले आहेत ना, याची ड्रायव्हरने खात्री करून घेतली पाहिजे.




### लहान मुलांची वाहतूक

लहान मुलांचे वय आणि वजनानुसार तयार केलेल्या विशेष सीट्स वरूनच मुलांची वाहतूक केली जाणे आवश्यक आहे. लहान मुलांना एकदम पुढे किंवा सीटबेल्टयिवाय बसू देऊ नका.




## » वाहनाची आणि प्रवाशांची सुरक्षितता

वाहन आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची काळजी घेणे हे ड्रायव्हरचे कर्तव्य आहे.

विशेषतः शहरी भागात चोरींचे प्रमाण वेगाने वाढत आहे.

नवीन आणि महागड्या गाड्यांवर कार चोरांची नेहमीच नजर असते. त्यांच्या चोरीच्या कार्यासाठी ते असुरक्षित वाहने आणि श्रीमंत प्रवाशांची निवड करतात. अयावेळेस त्यांचे काम सोपे होते. घरी किंवा कार्यालयाच्या ठिकाणी किंवा प्रवाशांसह किंवा रिकाम्या वाहनांनी प्रवास करण्यासाठी जास्त जागरूकतेची आणि सावधानतेची गरज आहे.




### वाहन चालविताना तसेच पार्किंगच्या वेळेस घ्यावयाची काळजी

- ड्रायव्हींग करीत असताना नेहमी दरवाजे आतून लॉक करून घ्या.
- ट्रॅफिक सिग्नलपायी कधीही भिकारी, फेरीवाले यांच्यायी उगाचच बोलू नका. अनेकदा तुमचे लक्ष विचलित करून, दुसरीकडे लक्ष वेधून तुमच्या गाडीतून मौल्यवान वस्तू पळवून नेल्या जाऊ शकतात.
- तुम्ही प्रवास करीत असलेल्या मार्गाबद्दल नेहमीच संपूर्ण माहिती करून घ्या.
- वेळेचे व्यवस्थापन करून मगच तुमच्या प्रवासाचे नियोजन करा.
- रात्रीच्या वेळेस, चांगली महिती असलेल्या रस्त्यांचीच निवड करा.
- कधीही अनोळखी व्यक्तींना लिफ्ट देऊ नका.
- अधिकृत आणि सुरक्षित पार्किंग परिसरातच गाडी पार्क करा.
- अनोळखी परिसरातच प्रमाणित असलेल्या मार्गदर्शकाची अर्थात् गाईडची मदत घ्या.
- स्थानिक पोलीसांचा, ॲम्बूलन्स रूग्णवाहीका आणि अग्नियामन दलाचे दूरध्वनी क्रमांक जवळ घेऊन ठेवा.

**वाहन पार्किंग करून त्यातून बाहेर पडताना, नेहमी सर्व खिडक्या बंद करा आणि सुरक्षित कुलुपे लावा आणि किल्ली तुमच्या सोबत ठेवा.**